## नवीन मतदान यंत्रातील अद्ययावत सुविधा.

(१) नव्याने विकसित केलेल्या मतदान यंत्रांना भारत निवडणूक आयोगास २००६ च्या नंतर पुरविण्यात आलेली बॅलट युनिट तसेच राज्य निवडणूक आयोगाकडे सध्या अस्तित्वात असलेली बॅलट युनिट जोडता येण्याची सुविधा आहेत. यामुळे जर एखादया निवडणुकीमध्ये अतिरिक्त बॅलट युनिटची गरज भासली तर ही बॅलट युनिट नवीन कंट्रोल युनिट सोबत वापरता येतील.

(२) मतदान यंत्र सुरु केल्यानंतर कंट्रोल युनिटचा युनिक सिरियल नंबर व त्यानंतर काढता येणाऱ्या मेमरीचा नंबर डिस्प्ले होईल.

(३) काढता येणारी मेमरी बदलून मतदान यंत्र सुरु केल्यास ईआर मेसेजऐवजी मेमरी चेंज असा मेसेज येईल.

(४) मतदान यंत्र सुरु केल्यानंतर ते आपोआप वेळ दर्शवेल.

(५) प्रत्येक मतदाराने केलेल्या मतदानाच्या वेळेची नोंद, मतदान यंत्रात होईल.

(६) मतदान यंत्रावर वेगवेगळी बटणे कोणत्या वेळी दाबण्यात आली याची नोंद होईल.

(७) नवीन मतदान यंत्रामध्ये अल्फा न्युमरिक डिस्प्ले (24 Character 17 segments)राहील.

(८) मतदान यंत्राची बॅटरी किती चार्ज आहे हे High /Medium/Low याद्वारे दाखविण्यात येईल.

(९) मतदान यंत्र सेट करताना त्यामध्ये प्रभाग क्रमांक व मतदान केंद्र क्रमांकाची नोंद करण्याची सोय असून, निकाल दर्शविताना अथवा प्रिंट करताना प्रभाग क्रमांक व मतदान केंद्र क्रमांक दर्शविल.

(१०) कंट्रोल युनिटमध्ये स्टोअर केलेला प्रोग्राम व बॅलट युनिटशी संबंधित प्रोग्राम यांची पडताळणी करुन तो योग्य असल्याचे दर्शविल.

(११) बॅलट युनिट व कंट्रोल युनिटला बाधा (Tamper) पोचविण्यात आलेली नाही हे शोधण्याची सुविधा.

(१२) बॅलट युनिट, कंट्रोल युनिट व काढता येणारी मेमरी यांच्या अनुक्रमांकांची नोंद त्यावर लेजर मार्कद्वारे करण्यात येणार आहे.

(१३) नॉन क्लोनेबल आय.डी. टॅग वापरुन मतदान यंत्राच्या विशिष्ट भागांची सुरक्षा करण्यात येणार आहे.

(१४) मतदान यंत्राची पीसीबी अशाप्रकारे बसविणे की, त्याला बाधा पोचविणे शक्य होणार नाही. तसेच मतदान यंत्रांचे स्क्रू काढल्यास ते चालणार नाहीत.

(१५) बॅलट युनिटवर ब्रेल लिपी दर्शविण्यात येणार असून, त्यामुळे अंध व्यक्तींना सोबती न घेता मतदान करणे शक्य होईल.

(१६) बॅलट युनिट व कंट्रोल युनिट मधील संवेदनशील भागांचे पॉटिंग करुन संरक्षण करण्यात येईल.

(१७) प्रिंटर जोडण्याची सुविधा ज्यामुळे निकाल, प्रत्येक बटन दाबल्याच्या वेळेची नोंद व न्यायालयात प्रत्येक मत दाखविण्याकरिता प्रिंटींगची सोय उपलब्ध होईल.

(१८) संगणकाला जोडण्याची सुविधा ज्यामुळे शेवटच्या १०० घटनांच्या नोंदीचा तपशील ठेवता येईल. मतदान यंत्राला बायोमेट्रिक तपासणी इत्यादीची सोय भविष्यात उपलब्ध करुन देता येईल.